|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**संलग्नता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नता/ २०७ /२०२६ दि.२७/०८/२०२६

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

**मा.प्राचार्य / मा.संचालक,**

कबचौउमवि यांचेशी संलग्नीत महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था आणि

स्वायत्त महाविद्यालय / स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था

यांना...

**विषय :- सर्व महाविद्यालयांना AISHE वेबपोर्टलवर नोंदणी अनिवार्य करणेबाबत...**

**संदर्भ:-** १) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं / सांख्यिकी / AISHE /पोर्टलवरील नोंदणी/ २०२६/E-१९६६२५९, दि.१४/०८/२०२६

२) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं / सांख्यिकी / AISHE Code अनिवार्य/परिपत्रक/ २०२६/E-३०१६६८, दि.१९/०८/२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकार यांच्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्व्हेक्षण कार्यक्रम (AISHE) अंतर्गत सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था यांची ऑनलाईन शैक्षणिक माहिती दरवर्षी AISHE पोर्टलच्या वेबलिंकद्वारे भरण्यासाठी सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालयांना AISHE Code अनिवार्य करण्यात येत असून उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून AISHE सर्व्हेक्षणाअंतर्गत सर्व विद्यापीठांना / महाविद्यालयांना स्कॉलरशिप, नॅक व इतर शैक्षणिक कामासाठी AISHE च्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे दरवर्षी AISHE सर्व्हेक्षणाची माहिती भरुन अपलोड करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

तरी सदर पत्रकाद्वारे नमूद करण्यात येते की, सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार विद्यापीठ संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी दरवर्षी AISHE सर्व्हेक्षणाची माहिती भरुन अपलोड करावी. त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालयांनी अद्यापपावेतो AISHE Code प्राप्त केलेला नसेल त्यांनी तात्काळ १५ दिवसाच्या आंत AISHE Code प्राप्त करुन घ्यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)

**कुलसचिव**

सोबत:- संदर्भीय शासन परिपत्रके.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
412 ई, बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे-411 001
stat.dhepune@nic.in संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in ☏ 020-29707093

क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE/पोर्टलवरील नोंदणी/2026/E-1966259 दिनांक- /08/2026

अत्यंत तातडीचे

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी/अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

विषय:- सर्व महाविद्यालयांना AISHE वेबपोर्टलवर नोंदणी अनिवार्य करणेबाबत..

संदर्भ:-1. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शाश्वत विकास ध्येयातील निर्देशक साध्य करण्याच्या अनुषंगाने केलेल्या प्रगतीचा दिनांक-23/07/2026 रोजीची आढावा बैठक व दिनांक-28/07/2026 रोजीचे पत्र

2. उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सन 2023-24 चा प्रकाशित केलेला अहवाल

महोदय/महोदया,

संयुक्त राष्ट्रे (United Nations) यांचेकडून स्विकृत करण्यात आलेली 17 शाश्वत विकास ध्येये (SGDs) व त्याअंतर्गत 169 लक्ष्ये (Targets) सन-2030 पर्यंत साध्य करावयाची असून शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घेतलेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने राज्याच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने (SGDs) तील उच्च शिक्षण क्षेत्रातील एकूण नोंदणी GER (Gross Enrollment Rate) स्थूल पटसंख्या प्रमाण ५०% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.2 अन्वयेच्या उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांनी AISHE सन 2023-24 चा प्रकाशित केलेला अहवालाच्या अनुषंगाने राज्याला जर SDG ची उद्दिष्टे पूर्णपणे साध्य करायची असतील,तर डेटा व्यवस्थापन (Data Management) मजबूत करावे लागेल. त्यासाठी उच्च शिक्षण क्षेत्रातील डेटा वेळेवर अद्ययावत (Update) करणे गरजेचे आहे,जेणेकरून भविष्यातील शैक्षणिक धोरणे अधिक प्रभावीपणे आखता येतील.

S.O. (Both) + AIID.O.
Circulate and
1/1/18

सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांना AISHE code अनिवार्य करण्यात येत असून उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याकडून AISHE अंतर्गत सर्व विद्यापीठांना/महाविद्यालयांना स्कॉलरशिप, नॅक व इतर शैक्षणिक कामासाठी AISHE च्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे दरवर्षी AISHE सर्वेक्षणाची माहिती भरून अपलोड करणे बंधनकारक आहे.

AISHE वेबपोर्टलवर उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विद्यापीठांची,संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांची भरलेल्या माहिती वरून राज्याचा GER, GPR व इतर आवश्यक माहीती तयार होते.बहुतांश AISHE कोड असलेली महाविद्यालये AISHE वेबपोर्टलवर माहीती भरत नाही तसेच काही महाविद्यालयांकडे AISHE कोड नसल्यामुळे AISHE वेबपोर्टलवर माहीती नोंदविण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे.

विद्यापीठांच्या कोणत्याही शैक्षणिक कामासाठी महाविद्यालयांना AISHE Code व AISHE प्रमाणपत्र अनिवार्य करावे.नवीन महाविद्यालय स्थापन होताच 1 महीन्याच्या आत AISHE Code प्राप्त करून घेणे बंधनकारक करावे. तसेच सर्व विद्यापीठांनी नवीन महाविद्यालयांना संलग्नता पत्र देतेवेळी 1 महिन्याच्या आत AISHE code प्राप्त करून घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

ज्या महाविद्यालयांनी अद्याप AISHE Code प्राप्त करून घेतलेला नाही अशा संलग्नित/ स्वायत्त महाविद्यालयांसाठी विद्यापीठांनी तात्काळ पुढील 15 दिवसांत कँप घेऊन AISHE Code प्राप्त करून घ्यावा.

तरी उपरोक्त बाबतची आवश्यक माहीती खालील नमूद तक्त्यात भरण्यात यावी.

| विद्यापीठाचे नाव | संलग्नित महाविद्यालयांची संख्या (फक्त उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत) | AISHE Code असलेली महाविद्यालयांची संख्या | AISHE Code अप्राप्त असलेल्या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 14-08-2026 13:28:27

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत-माहीतीस्तव सविनय सादर:-

1. मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभा,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई

2. मा. कुलगुरू,सर्व विद्यापीठे
3. सहसंचालक,सव विभागीय सहसंचालक कार्यालय यांनी देखील वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी

प्रत-पुढील कार्यवाहीसाठी:-

1. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
2. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
3. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
4. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर
6. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
7. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक,जि.नागपूर
8. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई
9. मुंबई विद्यापीठ,मुंबई
10. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
11. गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
12. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
412 ई, बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे-411 001
stat.dhepune@nic.in संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in ☎ 020-29707093

क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE Code अनिवार्य/परिपत्रक/2026/E-301668 दिनांक- /08/2026

**<u>परिपत्रक :</u>**

विषय:-अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (AISHE) कार्यक्रमांतर्गत सर्व महाविद्यालयांना वेबपोर्टलवर नोंदणी करून AISHE Code व AISHE प्रमाणपत्र अनिवार्य करणेबाबत..

संदर्भ:- या कार्यालयाचे क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE/पोर्टलवरील नोंदणी/2026/E-1966259/ DHEPN-STAT 011/1/2024-STATS-Part(3) I/2080783/2026/दिनांक-14/08/2026 रोजीचे पत्र

उच्च शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांच्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम(AISHE) अंतर्गत सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांची ऑनलाईन शैक्षणिक माहिती दरवर्षी AISHE पोर्टलच्या वेबलिंकद्वारे भरण्यासाठी सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांना AISHE code अनिवार्य करण्यात येत असून उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याकडून AISHE सर्वेक्षणाअंतर्गत सर्व विद्यापीठांना/महाविद्यालयांना स्कॉलरशिप, नॅक व इतर शैक्षणिक कामासाठी AISHE च्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे दरवर्षी AISHE सर्वेक्षणाची माहिती भरून अपलोड करणे या परिपत्रकाद्वारे बंधनकारक करण्यात येतआहे.

बहुतांश AISHE कोड असलेली महाविद्यालये AISHE वेब पोर्टलवर माहीती भरत नाही तसेच काही महाविद्यालयांकडे AISHE कोड नसल्यामुळे AISHE वेबपोर्टलवर माहीती नोंदविण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे.

AISHE वेब पोर्टलवरील विद्यापीठांच्या कोणत्याही शैक्षणिक कामासाठी महाविद्यालयांना AISHE Code व AISHE प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले असून सेक्टरल नोडल अधिकाऱ्यांकडे नव्याने नोंदणी झालेल्या आणि विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या ज्या नवीन महाविद्यालयांनी AISHE पोर्टलवर नोंदणी करून घेतली नसल्यास संबंधित विद्यापीठाने सदर महाविद्यालयांची नोंद वेबपोर्टलवर करुन घेणे आवश्यक आहे.याबाबत संबंधित महाविद्यालयांशी पत्र व दूरध्वनीद्वारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात यावीत.

S.O. Circulate to all affiliated Colleges & Institute + All D.U.
R.J. Jadhav

उपरोक्त सर्वेक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने ऑनलाईन स्वरूपात आपणांस काही तांत्रिक समस्या / अडचणी उद्भवल्यास खाली दिलेल्या तक्त्यातील अधिकारी/ कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

| संपर्क करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम | कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आय डी |
|---|---|---|---|
| श्री.स्वप्निल कोरडे, सांख्यिकी अधिकारी | उच्च शिक्षण संचालनालय, 412 ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-411 001 | कार्यालय- 020-29707093 मोबाईल- 7387953452 | stat.dhepune@nic.in |

**विद्यापीठांनी करावयाची आवश्यक कार्यवाही-**

1. विद्यापीठांच्या कोणत्याही शैक्षणिक, प्रशासकीय कामासाठी व विविध प्रकारच्या मान्यता देण्यासाठी महाविद्यालयांना AISHE Code व AISHE प्रमाणपत्र, AISHE सर्वेक्षण सन 2025-26 पासून अनिवार्य करावे.
2. ज्या महाविद्यालयांनी अद्याप AISHE Code प्राप्त करून घेतलेला नाही अशा संलग्नित/ स्वायत्त महाविद्यालयांसाठी विद्यापीठांनी तात्काळ पुढील 15 दिवसांत AISHE Code साठी विद्यापीठ स्तरावर शिबीर आयोजित करून नोंदणी प्रक्रिया सुरू करावी.
3. महाविद्यालयाने AISHE पोर्टलवरील नोंदविलेली माहिती तसेच विद्यापीठांकडील विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर संख्येबाबतच्या माहीतीमध्ये कोणतीही तफावत नसावी. याची जबाबदारी विद्यापीठांची राहील.
4. दरवर्षीप्रमाणे AISHE वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविद्यालयांची शैक्षणिक, प्रशासकीय कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षा निकाल,विविध प्रकारच्या मान्यता व इतर अनुषंगिक कामे) सेक्टरल नोडल कार्यालय आणि विद्यापीठातील इतर शाखा / विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत. याबाबत संबधित शाखेच्या प्रमुखांना अवगत करण्यात यावे.
5. महाविद्यालयांनी संबंधित वर्षाची अचूक माहिती नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड केल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याकडुन प्राप्त करून घेण्यात यावे.सदरील प्रमाणपत्राची एक प्रत उच्च शिक्षण संचालनालयास वरील ई-मेलद्वारे सादर करण्यात यावी.
6. महाविद्यालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सेक्टरल नोडल कार्यालय अथवा विद्यापीठाच्या AISHE नोडल अधिकाऱ्यांनी संबंधित महाविद्यालयास संबंधित वर्षाचे डिसीएफ अपलोडिंगचे काम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच महाविद्यालयांची सेक्टरल नोडल कार्यालय/विद्यापीठातील इतर शाखा / विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे.

7. उपरोक्त बाबींबाबत कोणतीही दिरंगाई झाल्यास AISHE चे काम पाहणारे संबंधित नोडल अधिकारी/ कर्मचारी/ महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

AISHE पोर्टलवर प्रत्येकवर्षी माहिती नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाने कार्यालयाच्या / विद्यापीठाच्या शाखेस सादर केल्यानंतर कार्यालयातील / विद्यापीठातील शाखा / विभाग यांचेकडुन संबंधित महाविद्यालयांचीच अनुषंगिक कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत.जेणेकरून महाविद्यालयांकडून करण्यात येणाऱ्या डिसीएफ अपलोडिंगच्या कामावर प्रभावी सनियंत्रण राखणे शक्य होईल

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 19-08-2026 16:47:10

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत-माहीतीस्तव सविनय सादर:-

1. मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई
2. मा. कुलगुरू,सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे /अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-

1. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
2. कुलसचिव,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
3. कुलसचिव,स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
4. कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
5. कुलसचिव,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
6. कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर
7. कुलसचिव,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
8. कुलसचिव,कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक,जि.नागपूर
9. कुलसचिव,श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई
10. कुलसचिव,मुंबई विद्यापीठ,मुंबई
11. कुलसचिव,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
12. कुलसचिव,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
13. कुलसचिव,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर